**CNR No.**
**MHJN070010432017**

| | | |
|---|---|---|
| प्रकरण दाखल तारीख | : | ०५-१२-२०१७ |
| प्रकरण नोंद तारीख | : | ०५-१२-२०१७ |
| निकालाची तारीख | : | १५-०५-२०२३ |
| कालावधीः | : | वर्षे – महिने – दिवस |
| | | ०५ ०५ १० |

**जाफ्राबाद येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी युवराज चंद्रकांत पाटील)

**फौजदारी किरकोळ अर्ज नं.१८९/२०१७**

**निशाणी नं. ४५**

| | |
|---|---|
| १. **सौ. मंदा संतोष सोनुने** | **)** |
| वय ३० वर्षे, व्यवसाय – गृहिणी | **)** |
| २. **पायल संतोष सोनुने** | **)** |
| **वय ६ वर्षे, व्यवसाय – शिक्षण** | **)** |
| ३. **युवराज संतोष सोनुने** | **)** |
| **वय ३ वर्षे,** | **)** |
| सर्व रा. सिपोरा अंभोरा | **)** |
| ता.जाफ्राबाद, जि.जालना. | **)अर्जदार** |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| **संतोष श्रीराम सोनुने** | **)** |
| वय ३२ वर्षे, व्यवसाय – शेती | **)** |
| रा. भारज, | **)** |
| ता.जाफ्राबाद, जि.जालना. | **)जाबदार** |

**अर्ज - फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १२५ अन्वये.**

**विधीज्ञः-**

श्री.जी.बी.वाहुळे – अर्जदारांतर्फे विधीज्ञ.

श्री.एस.पी.सिरसाठ – जाबदारतर्फे विधीज्ञ.

# न्यायनिर्णय

**( दिनांक १५/०५/२०२३ रोजी जाहीर )**

**अर्जदारांचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे**,

अर्जदार क्र.१ व जाबदार यांचा विवाह दि.२९/०३/२००८ रोजी मौजे सिपोरा अंभोरा येथे झाला असून जाबदाराने त्यांना तीन वर्षे चांगली वागणूक दिली. त्यानंतर जाबदार दारु पिऊन अर्जदार क्र.१ यास मारहाण करणे, चारीत्र्यावर संशय घेणे, मोटार सायकलसाठी पैश्याची मागणी करणे, शिवीगाळ करुन माहेरहून र.रु. सत्तर हजार आणले नाही तर घरात येऊ नको असे म्हणून मागील एक वर्षापासून घराबाहेर काढून दिले. अर्जदारास कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. जाबदाराने अर्जदारांच्या खाण्यापिण्याची तजवीज न केल्याने प्रस्तुतचा अर्ज फौ.प्र.सं. कलम १२५ अन्वये पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**२)** जाबदाराने नि.७ कडे म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारली आहेत. अर्जदार क्र.१ ही जाबदार यांची पत्नी आहे व त्यांना अर्जदार क्र.२ व ३ मुले आहेत इत्यादी नातेसंबंध वगळता इतर सर्व मजकूर धादांत खोटा व वस्तुस्थितीचा विपर्यास करणारा आहे. अर्जदार क्र.१ यास कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदयाअंतर्गत पोटगी देण्याचे आदेश पारित झाले असून जाबदारास केवळ आर्थिक त्रास देण्याच्या हेतूने सदरचा खोटा अर्ज दाखल केला आहे.

**३)** वरील सर्व बाबींचा विचार करता खालील वादप्रश्न या अर्जाच्या निर्णयाकरता उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र.१ स्वतःची देखभाल करण्यास असमर्थ असून जाबदारास पुरेसे साधन उपलब्ध असून देखील अर्जदारांना सांभाळण्यास नाकारल्याचे अर्जदार शाबीत करतात का ? | **नकारार्थी** |
| २. | अर्जदार प्रत्येकी दरमहा र.रु. पाच हजार जाबदाराकडून पोटगी मिळवण्यास पात्र आहेत का ? | **नकारार्थी** |
| ३. | अंतिम आदेश काय ? | **अर्ज नामंजूर** |

**कारणमिमांसा**

**४)** अर्जदार क्र.१ ने साक्षीदार क्र.१ म्हणून त्यांचे पुराव्याचे शपथपत्र **नि.१०** अन्वये दिले आहे. अर्जदार क्र.१ ची आई साक्षीदार क्र.२ द्वारकाबाई उत्तम तरमळे यांची साक्ष **नि.१८** कडे नोंदवली आहे. अर्जदारांनी त्यांना जादा पुरावा देणेचा नाही म्हणून **नि.१९** कडे पुरसीस दाखल केली आहे.

**५)** जाबदाराने अर्जदारांची कथने नाकारण्याकरीता स्वतःचे शपथपत्र **नि.२३** प्रमाणे साक्षीदार क्र.१ म्हणून दिले आहे. जाबदाराचे भाउ साक्षीदार क्र.२ विलास श्रीराम सोनुने यांची साक्ष **नि.३१** कडे नोंदवली आहे. जाबदाराने त्यांना जादा पुरावा देणेचा नाही म्हणून **नि.३३** कडे पुरसीस दाखल केली आहे.

**६)** मा.सर्वोच्च न्यायालयाने **रजनिश विरुध्द नेहा २०२० एस.सी.सी. ऑनलाईन एस.सी. ९०३** या न्याय निवाडयात निर्देशीत केल्याप्रमाणे अर्जदार क्र.१ यांनी त्यांचे मालमत्ता, उत्पन्न व खर्चाबाबतचे शपथपत्र **नि.४२** कडे दाखल केले आहे. तसेच जाबदाराने ते **नि.४०** कडे दाखल केले आहे.

**वादप्रश्न क्र.१ ते ३ :-**

**७)** वादप्रश्न क्र.१ व २ एकमेकांशी निगडीत असल्याने कारणमीमासांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी चर्चेकरीता ते एकत्रात घेतले आहेत. अर्जातील कथनांच्या

अनुषंगाने अर्जदारातर्फे विधीज्ञांनी युक्तीवाद केला. जाबदारास मौजे भारज बु. येथे १२ एकर बागायती शेती असून त्याचे ७/१२ उतारे अभिलेखावर दाखल केले आहेत. शेतीतून वार्षिक दहा ते बारा लाख उत्पन्न मिळते व जाबदाराने अर्जदारावर केलेल्या हिंसाचाराची भा.दं.वि. संहिता कलम ४९८-अ प्रमाणे केलेल्या तक्रारीची प्रत दाखल असून जाबदार प्रत्येकी अर्जदारास दरमहा र.रु. पाच हजार देऊ शकतो. म्हणून अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात यावा अशी विनंती केली.

**८)** याउलट जाबदारतर्फे विधीज्ञांनी अर्जदार मुळ अर्जात माहेरहून र.रु. सत्तर हजार आणले नाहीत व मागील एक वर्षापासून घराबाहेर काढून दिले असा जो मजकूर नमूद केला आहे तो कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अर्ज क्र.१०९/२०१४ मधील कथनांशी विसंगत असून त्यात र.रु. पन्नास हजारची मागणी केली व त्या अर्जात देखील परस्पर विरोधी कारण नमूद केले आहे. त्या अर्जाप्रमाणे अर्जदारांना दरमहा र.रु. तीन हजार आर्थिक सहाय देण्याचे आदेश झाले. त्याचप्रमाणे या जाबदाराने हिंदु विवाह कायदा कलम ९ प्रमाणे वैवाहिक हक्क पुन्हा स्थापन करण्यासाठी अर्ज करुन देखील अर्जदार जाबदाराकडे स्वतःहुन नांदण्यास आल्या नाहीत. याउलट नि. १४ कडे अर्जदार क्र.१ स्वतः व अज्ञान मुलांसाठी अंतरिम पोटगी मिळण्याबाबत अर्ज केला. तो अर्ज अशंतः मंजूर होऊन दरमहा र.रु. सात हजार अंतरिम पोटगी मंजूर झाली. त्यामुळे सदयस्थितीत अर्जदाराचा प्रस्तुतचा अर्ज पुन्हा पोटगी मिळवण्यासाठी कायदयाने चालण्यास पात्र नाही. जाबदार पुन्हा याही अर्जामध्ये पोटगी देण्यास सक्षम नाहीत. अर्जदार क्र.१ ने तिच्या नावे स्वतः मिळकत देखील खरेदी केली आहे. त्यामुळे अर्जदार स्वतःचा सांभाळ वरील अर्जात मिळणा-या पोटगी रकमेतून करण्यास सक्षम असल्याने प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**९)** येणेप्रमाणे अर्ज, म्हणणे व युक्तीवाद पाहता अर्जदार क्र.१ ने स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र नि.१० कडे दाखल केले असून त्यातील सर्व कथने मुळ अर्जातील कथनांची पुनरावृत्ती आहे. साक्षीदार उलटतपासा दरम्यान मान्य करतात

की, लग्नानंतर ते काही दिवसांनी औरंगाबाद येथे राहायला गेले, तेथे ते दोन ते तीन महिने राहिले, ती माहेरी मागील चार ते पाच वर्षे राहत आहे, तिला जाबदाराने चार ते पाच वर्षापूर्वी घरातून काढून दिले म्हणून अर्जदार क्र.१ ने जाबदार व त्यांच्या नातेवाईकांविरुध्द भा.दं.वि.संहिता कलम ४९८-अ प्रमाणे प्रकरण दाखल केले, तिने जाबदारविरुध्द शेत मिळकतीमध्ये हिस्सा मिळण्यासाठी देखील दावा दाखल केला आहे. साक्षीदार पुढे नाकारते की, ती माहेरी असताना मजुरीचे काम करते, तिला रोज मजुरीने र.रु. दोनशे मिळतात. त्यांच्या वडीलांकडे एक एकर कोरडवाहू शेती आहे.

**१०)** अर्जदार क्र.१ च्या कथनांना दुजोरा देण्यासाठी त्यांची आई द्वारकाबाई उत्तम तरमळे नि. १८ कडे अर्जातील कथनांच्या अनुषंगाने साक्ष देतात. उलट तपासादरम्यान त्या मान्य करतात की, त्यांची मुलगी जाबदारासोबत अंदाजे दोन वर्ष राहिली, जाबदाराने त्यांच्या मुलीस घरातून कधी हाकलून दिले त्याची तारीख, सत्तर हजार रुपयाची मागणी कोणत्या तारखेस केली इ. सांगता येणार नाही. या व्यतिरिक्त अर्जदार स्वतःहून माहेरी राहते इ. बाबत विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली.

**११)** येणेप्रमाणे तोंडी पुरावा पाहता अर्जदार व जाबदार ७/१२ उतारे, मुले शिक्षण विषयक असलेल्या शाळेतील पावत्या व अर्जदार क्र.१ आणि जाबदारमध्ये यापूर्वी चालु असलेल्या अर्जातील आदेश इ. दाखल केले आहेत. जाबदारकडे जाफ्राबाद येथे समाईकात भुमापन क्र. २३३ नि.१४, आई लक्ष्मीबाई हिच्या नावावर गट क्र.२९३ नि.१५ असून अर्जदार क्र.२ ज्ञानसागर इंग्लीश स्कुल येथे शिक्षण घेत असल्याबाबत येणा-या खर्चाच्या पावत्या नि.१७/१ ते १३ कडे दाखल केल्या असून दि.०३/०३/२०१८ व २८/०८/२०१९ रोजी अर्जदार क्र.२ हिच्या २०१७-१८ व २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाची फी र.रु. दोन हजार व तीन हजार चारशे सत्तर अनुक्रमे बाकी असून ती भरुन शाळेस सहकार्य करावे अशा मजकुराची आलेली नोटीस नि. १७/१४ व १५ कडे दाखल केली आहे.

**१२)** याउलट जाबदाराने म्हणणे नि.७ मधील कथनांव्यतिरिक्त जादा कथने नमूद करुन पुराव्याचे शपथपत्र नि.२३ कडे दाखल केले आहे. त्यात अर्जदार क्र.१ जाबदारासोबत काही दिवस चांगली नांदली परंतु, शुल्लक कारणावरुन त्यांच्यासोबत व कुटुंबियासोबत भांडणे करु लागली असे कथन केले आहे. तसेच अर्जदार क्र.१ जाबदाराच्या आई व भावासोबत वाद करायची म्हणून अर्जदार क्र.१ व जाबदार कुटुंबापासून वेगळे राहु लागले. परंतु, अर्जदाराच्या वागण्यात काही फरक पडला नाही. अर्जदार क्र.१ काहीही कारण नसताना त्यांना न सांगता दोन्ही मुलांना घेऊन माहेरी सिपोरा अंभोरा येथे निघून गेली. त्यांनी अर्जदार क्र.१ कडे कोणत्याही रकमेची मागणी केली नाही व तिला शारीरिक अथवा मानसिक त्रास दिला नाही. अर्जदारास कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अर्ज क्र. १०९/२०१४ मध्ये दरमहा र.रु. तीन हजार पोटगी मंजूर झाली असून नियमीत दिवाणी दावा क्र.१९/२०१५ वाटणी हिस्स्यासाठी न्यायप्रविष्ट आहे. तसेच अर्जदार क्र.१ नांदायला येण्यासाठी हिंदु विवाह कायदा कलम ९ प्रमाणे हिंदु विवाह अर्ज क्र.२१८/२०१९ दाखल केला असून तो ही प्रलंबित आहे. त्यांची अर्जदार क्र.१ यास सांभाळण्याची इच्छा असून प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**१३)** जाबदारास दारुचे व्यसन असून अर्जदार क्र.१ व त्यांचे भांडण झाल्याचे उलट तपासादरम्यान नाकारले आहे. तसेच अर्जदार क्र.१ यास मारहाण केल्यामुळे ती माहेरी आली, जाबदाराच्या आईवडील व भावाने अर्जदार क्र.१ चा छळ केला इ. कथने नाकारली आहेत. जाबदाराने भुसार मालाचा व्यवसाय सुरु केला असून महिन्याकाठी पन्नास ते साठ हजार रुपये कमावतात, वडिलोपार्जित शेती असून त्यांना स्वतंत्र हे. ०.९७ आर. शेती असून त्यातून वार्षिक तीस हजार रुपये उत्पन्न मिळते इ. कथने नाकारली आहेत.

**१४)** परंतु, अर्जदाराने नांदावयास यावे म्हणून जाबदाराने जो अर्ज दाखल केला आहे त्यामध्ये अर्जदार क्र.१ हजर झाली असून त्यानंतर ते अर्जदार क्र.१ यास आणण्यासाठी गेले होते त्याची तारीख त्यांना सांगता आली नाही. तसेच

त्यांनी अर्जदार क्र.१ यास नांदावयास यावे म्हणून भरपूर फोन केले इ. मान्य केले आहे. अर्जदार क्र.१ यास नि.१० कडील उलट तपासादरम्यान सुचित करण्यात आले की, तिला हदयविकाराचा त्रास असतो त्यामुळे ती अधुनमधून ब-याच वेळा आजारी असते, उपचारासाठी डॉक्टर खेडेकर, चिखली यांच्या दवाखान्यामध्ये जात असते. याउलट जाबदार नि. २३ कडील उलट तपासादरम्यान अर्जदारास महिन्यातून दोन वेळा दवाखान्यात जावे लागते इ. कथन नाकारले आहे.

**१५)** जाबदारातर्फे साक्षीदार क्र.२ भाऊ विलास श्रीराम सोनुने नि. ३१ कडे जाबदाराच्या कथनाप्रमाणे शपथपत्रात कथन करतात. त्यांच्या उलट तपासादरम्यान अर्जदारास उपयुक्त अशा कबुल्या अभिलेखावर आलेल्या नाहीत. अर्जदार क्र.१ ने तिच्या आजाराबाबत व होणा-या उपचारावरील खर्चाबाबत कोणताही तपशील, कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. याउलट नि. २६ कडे कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अर्ज क्र.१०९/२०१४ कौटुंबिक हिंसाचारपासून महिलांचे सरंक्षण कायदा, २००५ च्या अर्जाची प्रत दाखल केली असून जाबदार युक्तीवादात कथन करतात त्याप्रमाणे परिच्छेद क्र.३ मध्ये जाबदार त्यांच्या नातेवाईकांच्या सांगण्यावरुन अर्जदार क्र.१ यास मारहाण करु लागले व र.रु. पन्नास हजारची मागणी करु लागले इ. मजकूर नमूद आहे. जो की या अर्जातील र.रु. सत्तर हजारच्या मागणी विरुध्द दिसून येतो. तसेच परिच्छेद क्र.७ मध्ये दि. ०८/११/२०२१ रोजी जाबदारांनी मिळून अर्जदाराच्या अंगावरील दागिने काढून घेतले व घरातून हाकलून दिले असे नमूद केले आहे. प्रस्तुतचा मुळ अर्ज दि. ०५/१२/२०१७ रोजी दाखल केला असून अर्जदार परिच्छेद क्र.३ मध्ये कथन करते की मागील एक वर्षापासून तिला घराबाहेर काढून दिले त्यामुळे हा मजकूर देखील कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अर्ज क्र.१०९/२०१४ मधील कथनांच्या विसंगत आहे.

**१६)** जरी अर्जदार क्र.१ ने जाबदार व नातेवाईकांविरुध्द भा.दं.वि.संहिता कलम ४९८-अ प्रमाणे फिर्याद दिली व दोषारोप दाखल झाल्याची प्रत नि.२७ व

तिचा जबाब नि.५७, ५८ ची प्रत दाखल केली असली तरी त्यातही आरोपींनी र.रु. पन्नास हजार ची मागणी केल्याबाबत मजकूर नमूद आहे. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अर्ज क्र.१०९/२०१४ दि. ०३/०२/२०१८ रोजी अशंतः मंजूर करण्यात आला असून अर्जदार क्र.१ ते ३ यांना एकूण प्रतिमहा र.रु. तीन हजार आर्थिक सहाय दयावे असा आदेश झाला. त्या रकमेच्या वसुलीकरीता किरकोळ फौ. अर्ज क्र. २६४/२०१९ व ३५/२०२१ दाखल असून त्यापैकी अर्ज क्र. २६४/२०१९ दि.११/०२/२०२३ रोजी निकाली काढण्यात आला आहे. मुळ अर्ज क्र. १०९/२०१४ मधील आर्थिक सहाय अर्जदारास कमी पडत असल्याने फौ.प्र.सं. कलम १२७ प्रमाणे वाढीव पोटगी मिळण्यासाठी देखील किरकोळ फौ. अर्ज क्र. ७९/२०२१ दाखल केले असून ते न्यायप्रविष्ट आहे. जाबदाराने अर्जदार क्र.१ विरुध्द हिंदु विवाह कायदा कलम ९ प्रमाणे जो हिंदु विवाह अर्ज क्र.२१८/२०१९ दाखल केला आहे त्यामध्ये अर्जदार क्र.१ ने नि.१४ कडे तिच्या व मुलांच्या उदरनिर्वाहासाठी र.रु. दहा हजार प्रतिमहिना अंतरिम पोटगी मिळण्याबाबत अर्ज दि.१६/०१/२०२१ रोजी दाखल केला असून तो अर्ज दि.०३/०३/२०२२ रोजी अशंतः मंजूर करण्यात आला व या जाबदाराने अर्जदार क्र.१ हिस स्वतःसाठी व अज्ञान अपत्यासाठी दरमहा सात हजार रुपये अंतरिम पोटगी देण्याचे आदेश झाले.

**१७)** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मधील कलम १२५ चा उद्देश पत्नी, मुले आणि पालक यांच्या पालनपोषणाच्या व्यवस्थेसाठी असून जर पुरेशी साधन असलेली कोणतीही व्यक्ती स्वतःची देखभाल करण्यास असमर्थ असलेल्या पत्नीची किंवा त्याचे वैध किंवा बेकायदेशीर अल्पवयीन मुल, विवाहित असो वा नसो जो स्वतःची देखभाल करु शकत नाही अशा व्यक्तीस नकार दिल्यास मासिक भत्ता देण्याचे निर्देश देता येतील. जाबदाराने नि. ४० कडे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी अर्जदारांना मासिक भत्ता नियमीत देत असल्याबाबत कथन केलेले नाही. तसेच अर्जदार क्र.१ ने नि. ४२ कडे शपथपत्र दाखल केले असून जाबदाराकडून त्यांनाही रक्कम मिळत असल्याबाबत त्यात

नमूद केलेले नाही. प्रस्थापित कायदेशीर तत्वानुसार इतर कोणत्याही पोटगी कार्यवाहीमध्ये पिडितेला कोणताही आर्थिक दिलासा मिळाला असल्यास त्या व्यक्तीने न्यायदंडाधिका-यांना अशा सवलतीच्या अनुदानाची माहिती देण्यास बांधील आहे.

**१८)** फौ.प्र.सं. कलम १२५ च्या तरतुदी सध्याच्या काळात अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायदयाच्या तरतुदींविरुध्द नाही. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ कलम २०(१) नुसार फौ.प्र.सं. कलम १२५ च्या व्यतिरिक्त देखील पोटगी मंजूर करता येऊ शकते. पण अर्जदारास वरील दोन्ही अर्जामध्ये पोटगी मिळत असून त्यापैकी अर्ज क्र. १०९/२०१४ च्या वसुलीसाठी किरकोळ फौ. अर्ज क्र.२६४/२०१९ व ३५/२०२१ दाखल केले आहेत. **रजनिश वि. नेहा २०२० एस.सी.सी. ऑनलाईन एस.सी. ९०३, चंद्रभुषण कृष्णा कुमार वि. सविताबाई चंद्रभुषण २०२१ एस.सी.सी. ऑनलाईन छत्तीसगड ३७७१ व विशाल राजेसाहेब गोरे वि. अपर्णा विशाल गोरे, २०१८ एस.सी.सी. ऑनलाईन बॉम्बे १२०७** मध्ये असे निर्देशित केले आहे की, ''कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदयाअंतर्गत पिडितेस आर्थिक दिलासा देताना न्यायदंडाधिकारी विचारात घेतील की, पिडित व्यक्तीला तत्सम काही आर्थिक दिलासा मिळाला आहे का? आणि जर तसा आर्थिक दिलासा यापूर्वीच मिळाला असेल तर पुढे काही रक्कम आवश्यक असल्यास लिखित स्वरुपात कारण नोंदवून आणखी कोणतीही रक्कम मंजूर करणे आवश्यक आहे काय ते पाहतील. मा. न्यायालयाने या वरही जोर दिला आहे की, समायोजन आवश्यक आहे का आणि कमी रकमेचे समायोजन जास्त रकमेच्या विरुध्द समायोजित केले जाऊ शकते. जर पत्नी एकाच वेळी वेगवेगळया कायदयाअंतर्गत देखभालीचा दावा करु शकते. परंतु, याचा अर्थ असा नाही की पतीला त्या प्रत्येकी कार्यवाहीत दिलेल्या भरणपोषण भरण्यासाठी जबाबदार धरले जाऊ शकते. कलम १२५ अंतर्गत प्रदान केलेल्या देखभालीचे प्रमाण निश्चित करताना

न्यायदंडाधिकारी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदयाअंतर्गत पिडित महिलेला दिलेली अंतरिम देखभाल विचारात घेता येईल.

**१९)** या निर्देशाप्रमाणे अर्जदाराचा मुळ अर्ज, जाबदाराचे म्हणणे आणि अभिलेखावरील उपलब्ध तोंडी व कागदोपत्री पुरावा पाहता, जरी अर्जदार क्र.१ ने अर्जामध्ये रक्कम व घरातून हाकलून दिल्याबाबत वेगवेगळया प्रकरणामध्ये वेगवेगळे तपशील नमूद केले असले तरी अर्जदार क्र.१ ते ३ यास कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अर्ज क्र. १०९/२०१४ मध्ये प्रतिमहा तीन हजार व हिंदु विवाह अर्ज क्र. २१८/२०१९ मध्ये दरमहा सात हजार रक्कम मिळण्याचे आदेश केले असून त्याच्या वसुलीकरीता किरकोळ फौ. क्र. २६४/२०१९ व ३५/२०२१ दाखल केले आहेत. तसेच नियमीत दिवाणी दावा क्र. १९/२०१५ वाटणी हिस्सा मिळणेसाठी दाखल केला आहे.

**२०)** इतकेच नव्हे तर जाबदाराने नि.४४ सोबत मौजे सिपोरा येथील भुमापन क्र. २९५ चा ७/१२ उतारा दाखल केला असून सरलाबाई अंकुश अंभोरे यांना र.रु. चार लाख सव्वीस हजार मात्र अर्जदार क्र.१ ने देऊन दि. ११/०४/२०२२ रोजी नोंदणीकृत खरेदी दस्त क्र. ७८६/२०२२ दि. ११/०४/२०२२ रोजी करुन घेतला. त्या आधारे अर्जदार क्र.१ चे नाव अधिकार अभिलेखी फेरफार क्र. २६४३ ने नोंदवण्यात आले. त्यामुळे कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अर्ज क्र.१०९/२०१४, हिंदु विवाह अर्ज क्र. २१८/२०१९ मधील नि. १४ प्रमाणे मिळणारी पोटगी आणि वसुली अर्ज क्र. २६४/२०१९ व ३५/२०२१ पाहता अर्जदार स्वतःची देखभाल करण्यास असमर्थ आहेत असे म्हणता येणार नाही. तसेच वरील दोन्ही अर्जामध्ये अर्जदारांना जे आर्थिक सहाय मिळाले आहे त्यामध्ये त्यांची देखभाल होऊ शकत नाही असाही पुरावा अर्जदारांनी अभिलेखावर आणला नाही. तसेच अर्जदार क्र.२ यास दि. ०३/०३/२०१८ व २८/०८/२०१९ रोजीच्या मुख्याध्यापक, ज्ञानसागर इंग्लीश स्कुल यांनी पाठवलेल्या नोटिसीमुळे शैक्षणिक वर्षाची फी न भरता आल्यामुळे त्यास वार्षिक परीक्षेस बसता आले नाही

किंवा कसे याही बाबत अर्जदाराने पुरावा दिला नाही. त्यामुळे वरील दोन्ही अर्जातील आर्थिक सहाय अर्जदारांच्या गरजेप्रमाणे सदयस्थितीत पुरेसे असल्याने वादप्रश्न क्र.१ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवण्यात येतात व वादप्रश्न क्र.३ करीता पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. अर्जदारांचा अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मधील कलम १२८ प्रमाणे सदर न्यायनिर्णयाची एक प्रत विनाशुल्क अर्जदार व जाबदाराला देण्यात यावी.

**( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत केला )**

YUVRAJ CHANDRAKANT PATIL
Digitally signed by YUVRAJ CHANDRAKANT PATIL
Date: 2023.05.15 12:40:20 +0530

**जाफ्राबाद.**
**दिनांकः-१५/०५/२०२३**

**(युवराज चंद्रकांत पाटील)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**न्यायालय क्र.२, जाफ्राबाद.**

## –: प्रमाणपत्र :–

या द्वारे मी असे प्रतिपादन करतो की, वरील न्यायनिर्णय व त्याची तयार केलेली पी.डी.एफ. प्रत यामधील सर्व मजकूर मुळ न्यायनिर्णयाशी तंतोतंत बरोबर आहे.

स्वाक्षरित/–
(अहेमद आय.शेख)
दिनांक :– १५/०५/२०२३ लघुलेखक